# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य(भूमी)/C39495 दिनांक : 24/5/2021

## परिपत्रक

विषयः- **कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणेबाबत व इतर बाबींबाबत..**

संदर्भ :-१) परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/B ५०८४९ दिनांक ०१.०७.२०२०
२) परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/C६९५९३ दिनांक २२.१०.२०२०
३) परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/C९६१८० दिनांक ११.११.२०२०

सन-२०२० मध्ये कोरोना विषाणूंचा (Covid-१९) चा वाढता प्रार्दुभाव व कोविड १९ च्या आपत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत(Force Majeure) रियल इस्टेट प्रकल्पासंदर्भात विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, नागरी विकास प्राधिकरणे, राज्य शासनाची इतर कार्यालये/ यंत्रणा यांच्या मार्फत देण्यात आलेल्या विविध संविधानिक परवानग्या , परवाने, नोंदणी इमारत आराखडा मंजूरी व इतर ना हरकत प्रमाणपत्र यांनाही कोणत्याही अर्ज प्रक्रियेशिवाय नऊ महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याबाबत केंद्रशासनाच्या दिनांक २८ मे २०२० च्या सूचनांनुसार व नगर विकास विभाग नगर विकास विभाग (नवि-१३) यांच्या शासन निर्णय दिनांक ०४.०६.२०२० नुसार कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिलेले होते. त्यामुळे प्रकरणी देय शुल्क(विलंब शुल्क न आकारता) भरण्याचा कालावधी, सर्व संबंधित प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, नाहरकत प्रमाणपत्रे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ. ची लॉकडाऊन/अनलॉक कालावधीत समाप्त होणारी वैधनिक मुदत परवानगी पत्रात नमूद केलेल्या पूर्व अटींची पूर्तता करण्यासाठी तसेच विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यन्त वाढविण्यात आला होता.

तथापि सन-२०२० मध्ये कोरोना विषाणूच्या महामारीची लाट व त्यामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे विविध स्तरावरील उद्योग बंद पडल्यामुळे मोठया प्रमाणात कामगार स्थलांतरीत झाले औद्योगिक विकास थांबला व त्यांच्या औद्योगिक युनिटवर वाईट परिणाम झाले आहेत. त्यातून स्थिरावत असताना, आता कोरोना विषाणूची दुसरी लाट आलेली असून त्यावर उपाय म्हणून शासनाने कडक निर्बंध



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

लागू केले आहेत तसेच या काळात संपूर्ण संचारबंदी लागू केली आहे. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व प्रकारची खाजगी कार्यालये/ बांधकामे शासनाने बंद केलेली आहेत. तसेच अत्यावश्यक सेवा वगळता इतर सेवा बंद करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कामगारांना काम नसल्याने ते स्थलांतरीत होत आहेत. त्यामुळे उत्पादनावर/उद्योगावर त्याचा विपरित परीणाम होत आहेत. त्यामुळे प्रकरणी उद्योजकांस मुभा/सूट देणे आवश्यक असल्याने सदर विषयावर संचालक मंडळाच्या दिनांक २९.०४.२०२१ रोजी झालेल्या ३८९ व्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ६२४१ पारीत करण्यात आला. सदरहू पारीत ठरावानुसार कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर महामंडळाच्या उपरोक्त सर्दर्भिय परिपत्रकांत तसेच ठराव क्र. ६१४६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१ दिनांक ३१.१२.२०२० पर्यन्त नमूद देय शुल्क भरण्याचा कालावधी (विलंब शुल्क न आकारता) दिनांक ३०.०६.२०२१ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

२. ज्या भूखंडाचा विकास कालावधी दिनांक ३१.१२.२०२० पर्यन्त किंवा तदनंतर संपलेला आहे व ज्या भूखंडधारकांनी भूखंडावरील इमारतीचे नकाशे मंजूर करुन घेवून इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे अशा भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपलेल्या दिनांकापासून कोणतीही अतिरिक्त प्रिमियम रक्कम न आकारता ३०.०६.२०२१ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

३. **ज्या भूखंडधारकांनी भूखंडावरील इमारतीचे नकाशे मंजूर करुन घेवून इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे व ज्या भूखंडधारकांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये संपलेला आहे/संपणार आहे** अशा उद्योजकांना खालीलप्रमाणे मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.

अ) ज्या उद्योजकांनी मुदतवाढ शुल्क भरुन मुदतवाढ मंजूर करुन घेतली आहे व अशा उद्योजकांना विकास कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये संपलेला आहे/संपणार आहे. अशा उद्योजकांना दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्तचा कालावधी विनाशुल्क असल्याने त्यांनी जेवढया कालावधी करीता सशुल्क मुदतवाढ घेतलेली आहे. तेवढया कालावधीकरीता त्यांना विनाशुल्क मुदतवाढ पुढे दिनांक ०१.०७.२०२१ पासून लागू करण्यात यावी.

(उदा. एखादा भूखंडधारकाने दिनांक ३०.०७.२०२० पर्यन्त सशुल्क मुदतवाढ घेतली असेल तर त्याला दिनांक ०१.०८.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्त विनाशुल्क मुदतवाढ लागू राहील तसेच त्याने दिनांक ०१.०३.२०२० ते दिनांक ३०.०७.२०२० पर्यन्त सशुल्क मुदतवाढ घेतली असल्यामुळे व



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

त्याकालावधीकरीता त्यांना कोव्हिड-१९ चा लाभ मिळाला नसल्यामुळे सदरहू भूखंडधारकास पुढे दिनांक ०१.०७.२०२१ पासून सदरहू ५ महिन्याचा कालावधी विनाशुल्क वाढविण्यात यावा.)

ब) ज्या उद्योजकांचा विकास कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये संपलेला आहे/संपणार आहे. अशा उद्योजकांना दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्तचा कालावधी विनाशुल्क आहे. त्यामुळे त्यांचा ज्या तारखेस विकास कालावधी संपलेला आहे, तेवढया कालावधी करीता त्यांना विनाशुल्क मुदतवाढीचा लाभ दिनांक ०१.०७.२०२१ पासून लागू करण्यात यावा.

(उदा. एखादा भूखंडधारकाचा दिनांक १५.०८.२०२० पर्यन्त विकास कालावधी संपला असेल तर त्याला दिनांक १५.०८.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्त विनाशुल्क मुदतवाढ लागू राहील तसेच प्रस्तुत प्रकरणी त्यांना दिनांक ०१.०३.२०२० ते दिनांक १५.०८.२०२० या कालावधीचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांना दिनांक ०१.०७.२०२१ पासून सदरहू साडेपाच महिन्याचा कालावधी विनाशुल्क वाढविण्यात यावा.)

क) ज्या उद्योजकांनी दिनांक ३१.१२.२०२० तारखेनंतर सशुल्क मुदतवाढ मंजूर करुन घेतली आहे व अशा उद्योजकांचा विकास कालावधी दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये संपलेला आहे/संपणार आहे. अशा उद्योजकांना दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्तचा कालावधी विनाशुल्क असल्याने त्यांनी जेवढया कालावधी करीता मुदतवाढ शुल्क भरलेले आहे तेवढया कालावधीकरीता त्यांना विनाशुल्क मुदतवाढ पुढे सशुल्क मुदतवाढीचा कालावधी संपलेल्या तारखेपासून लागू करण्यात यावा.

(उदा. एखादा भूखंडधारकाने दिनांक ३१.१२.२०२१ पर्यन्त सशुल्क मुदतवाढ घेतली असेल. त्यांना दिनांक ०१.०३.२०२० ते ३०.०६.२०२१ पर्यन्त विनाशुल्क मुदतवाढ लागू आहे. अशा भूखंडधारकाने दिनांक ०१.०१.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२१ पर्यन्त सशुल्क मुदतवाढ घेतली असल्यास अशा भूखंडधारकास दिनांक ०१.०१.२०२१ ते ३०.०६.२०२१ या कालावधी करीता कोव्हिड-१९ चा लाभ न मिळाल्यामुळे सदरहू भूखंडधारकास सशुल्क मुदतवाढीचा कालावधी दिनांक ३१.१२.२०२१ रोजी संपल्यानंतर पुढे ६ महिन्याचा कालावधी विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करुन वाढविण्यात यावा.)

४. उपरोक्त अ.क्र. २ व ३ प्रमाणे विकास कालावधी वाढविण्याचे अधिकार महामंडळाच्या दिनांक २६.०९.२०१६ च्या परिपत्रकानुसार ज्या भूखंडधारकांनी भूखंडावरील इमारतींचे नकाशे मंजूर करुन घेवून इमारतींचे बांधकाम सुरु केले आहे अशा भूखंडांच्या अनुषंगाने औद्योगिक, व्यापारी, निवासी,



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

प्राधान्य सदराखालील भूखंड वाटपाच्या /हस्तांतरणाच्या अधिकारानुसार संबंधित प्रादेशिक अधिकारी / उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील

५. सर्व संबंधित प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, नाहरकत प्रमाणपत्रे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ. ची लॉकडाऊन/अनलॉक कालावधीत समाप्त होणारी वैधनिक मुदत परवानगी पत्रात नमूद केलेल्या पूर्व अटींची पूर्तता करण्यासाठी दिनांक ३०.०६.२०२१ पर्यन्त वाढविण्यात यावी. सदरहू वाढीव कालावधीसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क अगर व्याज आकारणी करण्यात येवू नये.

६. दंडात्मक पोटभाडयाची रक्कम वसूल न करता महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार ३ टक्के अथवा ०.५ टक्के दराने पोटभाडयाची रक्कम वसूल करण्याचा कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

७. मऔवि महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील, जे उद्योग घटक मऔवि महामंडळाची पाणीपुरवठा आकारणी थकबाकी, सेवा शुल्क आकारणी, अग्निशमन सेवा शुल्क, पर्यावरण रक्षण शुल्क, सांडपाणी निःसारण अधिभाराच्या आकारणीची संपूर्ण थकबाकी(जीएसटी सह) एक रक्कमी अथवा हप्ताहप्त्याने संपूर्णपणे आणि चालू देयकाची आकारणी नियमितपणे माहे डिसेंबर-२०२१ अखेर पर्यन्त अदा करतील. अशा सर्व उद्योग घटकांना एकूण विलंब शुल्क आकारात ५० टक्के सूट देण्यात यावी. परंतु अशा सर्व उद्योग घटकांना अशा आकारणीपोटी महामंडळास यापूर्वी अदा केलेल्या एकूण परिगणित विलंब शुल्क आकारणीवरील संपूर्ण जीएसटी रक्कम अदा करणे अनिवार्य राहील.(एकूण विलंब शुल्कावरील जीएसटी रक्कमेवर कोणतीही सूट देय असणार नाही. ती एक रक्कमी भरावी लागेल)

८. ज्या उद्योजकांनी विलंबशुल्कासह देय रक्कम महामंडळास भरणा केली आहे, अशा उद्योजकांना त्यांनी भरलेली रक्कम परत करण्यात येवू नये.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in